# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकिय ठराव दि. 16/02/2024

**प्रकरण क्र. 380 :- मिरा भाईदर महानगरपालिकेचे सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** 380 :-

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी काही प्रस्तावांना सर्वसाधारण सभेची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. आणि, ज्या अर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मुदत दि. 28 ऑगस्ट, 2022 रोजी संपलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही. आणि, ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 "अ" च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतूदीनुसार मिरा भाईदर महानगरपालिका येथे प्रशासक पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाने केलेली आहे.

आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रकामध्ये यांनी सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट विचारात घेवून सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.23 लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास मान्यता देत आहे. पारित ठरावानुसार संबंधीत विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2023-24 सुधारीत | 2024-25 मुळ |
|---|---|---|
| सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रक = एकूण जमा | 173418.94 | 229794.86 |
| सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रक = एकूण खर्च | 173398.09 | 229771.71 |
| अखेरची शिल्लक | **20.85** | **23.15** |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रशासकिय ठराव दि. 16/02/2024

**प्रकरण क्र. 381 :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** 369 :-

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी काही प्रस्तावांना सर्वसाधारण सभेची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. आणि, ज्या अर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मुदत दि. 28 ऑगस्ट, 2022 रोजी संपलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही. आणि, ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 "अ" च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतूदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाने केलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून अंदाजपत्रकास मंजूरी देत आहे. पारित ठरावानुसार संबंधीत विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2023-24 सुधारीत | 2024-25 मुळ |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहीत) | 5586.94 | 14139.88 |
| परिवहन खर्च | 5575.26 | 14121.20 |
| अखेरची शिल्लक | **11.68** | **18.68** |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रशासकिय ठराव दि. 16/02/2024

**प्रकरण क्र. 382 :-** **अग्निशमन विभागाचे सन 2023-24 चे सुधारित व सन 2024 -25 चे अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** ३८२ **:-**

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी काही प्रस्तावांना सर्वसाधारण सभेची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. आणि, ज्या अर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मुदत दि. 28 ऑगस्ट, 2022 रोजी संपलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही. आणि, ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 "अ" च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतूदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाने केलेली आहे.

आयुक्त तथा प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन 2023-24 चे सुधारित व सन 2024-25 चे अग्निशमन अंदाजपत्रकामध्ये लेखाशिर्षनिहाय वाढ/घट तसेच इतर दुरूस्त्या करून अग्निशमन विभागाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देत आहे. पारित ठरावानुसार संबंधीत विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(रु. लाखांत)

| तपशिल | 2023-24 सुधारीत | 2024-25 मुळ |
|---|---|---|
| एकूण जमा | 4700.32 | 6227.32 |
| एकूण खर्च | 2892.00 | 6201.00 |
| अखेरची शिल्लक | **1808.32** | **26.32** |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा // दि. १६/२/२०२४

**प्रकरण क्रमांक.** ( 383 ) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने (सन 2023-24) अंतर्गत विकास कामे करणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरपालिकेलगत असून शहराचा विकास वेगाने होत आहे. शहराची लोकसंख्या देखिल वेगाने वाढत असून नागरीकांना पायाभुत सोयी पुरविणे आर्थिक अडचणी मुळे कठीण होत आहे. शहरात मोठया प्रमाणावर नागरी वस्त्या असून सदर वस्त्यामधील नागरीकांचे राहणीमान व स्तर उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना मुलभूत सोयी पुरविणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. या करीता शासनाच्या अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. प्रभाग क्र.13 व 14 मध्ये विविध विकास कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार नागरी वस्त्यांच्या भागात खालील प्रमाणे विकास कामे करण्याची आवश्यकता असून त्या करीता खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशीगांव येथील मनपा शाळा क्र.04 मध्ये विविध कामे करणे. | रु.75,34,100/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील मनपा शाळा क्र.09 मध्ये विविध कामे करणे. | रु.52,22,350/- |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रा.म.क्र.08 वरील प्रभाग क्र.14 मध्ये शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.62,43,550/- |
| | **एकुण** | **रु.1,90,00,000/-** |

वरील कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना या योजनेतून करण्यासाठी व शासनाकडून निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव पाठविणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे..

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-05/DK/23-24/MG-8

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव ३८३ दिनांक :- १६/२/२०२४

**प्रकरण क्रमांक :-** (३८३) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने (सन 2023-24) अंतर्गत विकास कामे करणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरपालिकेलगत असून शहराचा विकास वेगाने होत आहे. शहराची लोकसंख्या देखिल वेगाने वाढत असून नागरीकांना पायाभुत सोयी पुरविणे आर्थिक अडचणी मुळे कठीण होत आहे. शहरात मोठया प्रमाणावर नागरी वस्त्या असून सदर वस्त्यामधील नागरीकांचे राहणीमान व स्तर उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना मुलभूत सोयी पुरविणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. या करीता शासनाच्या अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. प्रभाग क्र.13 व 14 मध्ये विविध विकास कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार नागरी वस्त्यांच्या भागात खालील प्रमाणे विकास कामे करण्याची आवश्यकता असून त्या करीता खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशीगांव येथील मनपा शाळा क्र.04 मध्ये विविध कामे करणे. | रु.75,34,100/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील मनपा शाळा क्र.09 मध्ये विविध कामे करणे. | रु.52,22,350/- |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रा.म.क्र.08 वरील प्रभाग क्र.14 मध्ये शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.62,43,550/- |
| | **एकुण** | **रु.1,90,00,000/-** |

वरील कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना या योजनेतून करण्यासाठी व शासनाकडून निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव पाठविणेस प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र.३८३ दिनांक १६/२ /2024

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषतः कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन खालील कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना या योजनेतून करण्यासाठी व शासनाकडून निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव पाठविणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशीगांव येथील मनपा शाळा क्र.04 मध्ये विविध कामे करणे. | रु.75,34,100/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील मनपा शाळा क्र.09 मध्ये विविध कामे करणे. | रु.52,22,350/- |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रा.म.क्र.08 वरील प्रभाग क्र.14 मध्ये शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.62,43,550/- |
| | **एकुण** | **रु.1,90,00,000/-** |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(संजय काटकर, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-05/DK/23-24/MT-11

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

## // गोषवारा //

दि. ९६।२।२०२४.

प्रकरण क्र.३८४ :- मा. उच्च न्यायालयाकडील W.P.No.7328/2021 मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. विरुध्द मिरा भाईंदर महानगरपालिका व इतर मधील दि.30/11/2021 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (1) (h) नुसार तडजोड करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस चालविणेसाठी Net Cost Contract (NCC) with Viability Gap Funding (VGF) तत्वावर बस ऑपरेटर म्हणून मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची दि.31/07/2019 रोजीच्या करारानुसार दि.01/08/2019 पासुन नियुक्ती करण्यात आली होती. तसेच कोवीड -19 कालावधीसाठी त्यांचे समवेत दि.25/09/2020 रोजी पुरवणी करारनामा करण्यात आला होता.

परंतू मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचेमार्फत कोवीड-19 चे निर्बंध शिथिल झाल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेने सुचना देऊनही सर्वसाधारण प्रवाशांसाठी बससेवा न चालविल्याने त्यांचे समवेत केलेले सदरचे करार मा. आयुक्त यांचे दि.05/10/2020 रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आले होते. सदर मा. आयुक्तयांचे दि.05/10/2020 रोजीच्या आदेशा विरुध्द मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.94075/2020 दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.15/10/2020 रोजी आदेश पारित करून मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांना त्यांचे कर्मचारी यांचे संरक्षणासाठी व डेपोमधून बस मार्गस्त करणेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त देणेबाबत मा. पोलीस आयुक्त यांना आदेशित केले होते.

मा. उच्च न्यायालयाकडील दि.15/10/2020 रोजीच्या आदेशानुसार मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि.16/10/2020 पासुन बससेवा सुरु केली होती. सदर याचिकेमध्ये पुढील सुनावणी दि.05/11/2020 व दि.26/11/2020 रोजी झाली. दि.26/11/2020 रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सदर रिट याचिका मा. उच्च न्यायालयाने निकाली काढून दि.15/10/2020 रोजीचे आदेश तीन आठवडे म्हणजे दि.17/12/2020 पर्यंत लागू राहतील असे आदेश पारित केले होते. तसेच दि.26/11/2020 रोजीच्या आदेशामध्ये याचिकेतर्फे यांना नविन याचिका दाखल करण्याची Liberty देण्यात आली होती.

मा. उच्च न्यालयाने रिट याचिका क्र.94075/2020 दि.26/11/2020 रोजी निकाली काढून दि.15/10/2020 राजीचे आदेश दि.17/12/2020 पर्यंत लागू राहतील असे आदेशीत केले होते. त्यामुळे मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि.16/10/2020 ते दि.17/12/2020 पर्यंत बससेवा चालविली होती व सदर याचिका निकाली काढल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.18/12/2020 पासुन मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचेकडून बसेस व साधनसामुग्री ताब्यात घेऊन मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वत: बससेवा सुरु केली होती.

दरम्यानच्या कालावधीमध्ये मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची नविन रिट याचिका (ST) No.98298/2020 (W.P No.7328/2021) दाखल केली होती. मात्र सदर याचिकेमध्ये दि.18/12/2020 रोजी मा. उच्च न्यायालयाने "तात्पुरता स्वरुपात कर्मचारी घेऊन बससेवा चालविण्याचे" मिरा भाईंदर महानगरपालिकेचे म्हणणे मान्य करून आदेश पारित केले होते. त्यानुसार पर्यायी व्यवस्था होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.18/12/2020 ते दि.02/02/2021 या कालावधीत स्वत: बससेवा चालविली आहे. तसेच दि.03/02/2021 पासुन नविन ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांची नियुक्त करण्यात आली होती. तसेच मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे समवेत केलेले करार महानगरपालिकेने रद्द केल्याने करारातील अट क्र.22-3.1 (व) नुसार त्यांनी बँक गॅरंटी स्वरुपात भरणा केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.1.00 कोटी जप्त करण्यात आली आहे.

मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र.7328 of 2021 बाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दि.30/11/2021 रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीमध्ये मा. न्यायालयाने आदेश पारित केले असून दोन्ही पक्षकार यांनी एकत्रीत बसुन वादाचे निराकरणे करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेसमवेत बैठका घेऊन चर्चा करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी दि.13/12/2021 रोजी त्यांच्या मागणी रक्कमेचे निवेदन सादर करून एकूण रक्कम रु.19,43,99,990/- इतकी रक्कम मागणी केली आहे. मात्र मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी मागणी केलेल्या रक्कमेबाबत महानगरपालिका दप्तरी तपासणी करून त्यांचे समवेत तत्कालीन अति. आयुक्त / आयुक्त यांचेकडे बैठका घेऊन चर्चा करण्यात आली आहे.

मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी मागणी केलेल्या रक्कमा मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेशी वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सदर प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (1) (h) प्रमाणे तडजोड प्रस्ताव विचारात घेण्याचे विधी विभागाने अभिप्राय दिले आहेत. तसेच सदरचे न्यायालयीन प्रकरण पुढे चालू राहिल्यास महानगरपालिकेस जास्तीचा भुर्दंड बसू शकतो. त्यामुळे सदर प्रकरणी मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेशी झालेल्या चर्चेनुसार व उपलब्ध कागदपत्रावरून खालीलप्रमाणे देय व वसुल करावयाच्या रक्कमा दोन्ही पक्षकारांच्या संमतीने निश्चित करण्यात आल्या आहेत.

| मे. भागिरथी यांची मागणी/ देय होणारी रक्कम | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशिल | मागणी रक्कम रु. | शेरा |
| 1 | Viability Gap Funding (VGF) रक्कम कराराप्रमाणे देय | रु.90,39,756/- | परीवहन उपक्रमाच्या बसेस प्रवर्तनासाठी Viability Gap Funding (VGF) करीता रक्कम देय आहे.<br>दि.14/08/2020 ते दि.31/08/2020 - रु.1,33,674/-<br>दि.01/09/2020 ते दि.07/09/2020 - रु.54,404/-<br>दि.16/10/2020 ते दि.31/10/2020 - रु.5,47,351/-<br>दि.01/11/2020 ते दि.30/11/2020 - रु.24,11,069/-<br>दि.01/12/2020 ते दि.17/12/2020 - रु.58,93,258/- |
| 2 | Viability Gap Funding (VGF) रक्कम (डेपो ते टर्मिनल Dead K.M.) कराराप्रमाणे देय | रु.6,02,684/- | डेपो ते टर्मिनल करीता Dead K.M.ची रक्कम कराराप्रमाणे मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि.यांना देय आहे.<br>ऑगस्ट - 2019 ते मार्च - 2020 - रु.6,02,684/- |
| 3 | Viability Gap Funding (VGF) व्यतिरिक्त रक्कम कोवीड -19 कालावधी शासननिर्णय दि.11/01/2021 प्रमाणे देय | रु.41,95,579/- | मा.परिवहन समिती सभा दि.17/08/2020 ठराव क्र.8 व मा.परिवहन समिती सभा दि.12/10/2020 ठराव क्र.10 नुसार चालविलेल्या बससाठी रु.29.26 दराने रक्कम अदा करणेस मंजुरी दिली आहे.परंतु चालविलेल्या बससाठी प्रत्यक्ष कि.मी करीता तिकिट उत्पन्नासाठी व वाढीव खर्च विचारात घेऊन रु.26.98 प्रति कि.मी. प्रमाणे देयक अदा करणे योग्य असुन Viability Gap Funding (VGF) व्यतिरिक्त रु.26.98 प्र.कि.मी प्रमाणे रक्कम अदा करणेस शासन निर्णय दि.11/01/2021 अन्वये शासन मंजूरी दिलेली आहे.<br>दि.01/06/2020 ते दि.11/08/2020 - रु.41,95,579 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | Ticket Different रक्कम पुरवणी करारनामाप्रमाणे | रू.28,38,962/- | परिवहन उपक्रमाच्या बसेस प्रवर्तनासाठी Ticket difference करीता रक्कम देय आहे.<br>दि.14/08/2020 ते दि.31/08/2020 - रू.23,211/-<br>दि.01/09/2020 ते दि.07/09/2020 - रू.160/-<br>दि.16/10/2020 ते दि.31/10/2020 - रू.94,714/-<br>दि.01/11/2020 ते दि.30/11/2020 - रू.7,66,912/-<br>दि.01/12/2020 ते दि.17/12/2020 - रू.19,53,965/- |
| 5 | Dead KM (VGF फिश मार्केट ते भाईंदर (प.) स्टेशन) | रू.9,22,535/- | भाईंदर (प.) स्थानक येथील वास्तविक परिस्थितीनुसार बसगाडया फिश मार्केट येथे जाऊन वळविणेसाठी चालविलेले कि.मी. साठी रक्कम देय असून त्यासाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता घेण्यात आली आहे.<br>दि.01/08/2019 ते दि.21/03/2020 - रु.7,34,418/-<br>ऑगस्ट - 2020 ते डिसेंबर - 2020 - रु.1,88,117/- |
| 6 | Insurance प्रिमियम रक्कम परतावा.<br>• देय रक्कम रू.36,74,334/- (दि.17/12/2020 नंतर वैध कालावधीसाठी)<br>• वसुली रक्कम रू.22,70,107/- (दि.01.08.19 पूर्वी मनपाने भरलेली दि.01/08/2019 नंतर वैध कालावधीची)<br>• निव्वळ देय रक्कम रू.14,04,227/- | रू.14,04,227/- | • मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि.यांना दि.17/12/2020 पर्यंत बस चालविल्या असल्याने दि.17/12/2020 नंतर वैध कालावधीची त्यांचे देयकातून कपात केलेली विमा रक्कम मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांना परतावा करणे.<br>• दि.01/08/2019 पूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिका विमा नुतनीकरण केले होते. त्याची दि.01/08/2019 नंतरची वैध कालावधीसाठी विमा रक्कम मे.भागिरथी यांचेकडून वसूल करणे.<br>• देय रक्कम रू.36,74,334/- मधून वसुल करावयाची रक्कम रु.22,70,107/- वजा करून रु.14,04,227/- निव्वळ देय आहे. |
| 7 | Insurance प्रिमियम रक्कम परतावा (Unregister Buses साठी विमा संचालनालयाकडून परतावा झालेली रक्कम) | रू.15,31,967/- | M/s.Bhagirathi MBMT Pvt. Ltd. यांचेकडुन देयकातुन वसुल केलेली आर.टी. ओ. नोंदणी न झालेल्या 11 बसेसची विमा संचालनाकडून परत मिळालेली विमा रक्कम M/s.Bhagirathi MBMT Pvt. Ltd. यांना परतावा देय आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | तिकीट साठा व तिकीट रोल परत घेतल्याने तिकीट छपाई व रोल खरेदी रक्कम अदा करणे. | रू.3,42,617/- | मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचा करार रद्द झाल्याने तिकीट साठा व ETM थर्मल पेपर रोल महानरगपालिकेने दि.18/12/2020 रोजी ताब्यात घेतले आहेत. मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांना कंत्राट देताना महानगरपालिकेने स्टेशनरी, तिकीट साठा हस्तांतरीत करून त्याची रक्कम त्यांचे देयकातून वसुल केली होती.त्याचप्रमाणे त्यांच्याकडून साठा ताब्यात घेतल्यानंतर त्यांना त्यापोटी रक्कम देय आहे.<br><br>मॅन्यूअल तिकीट साठा - रु.3,06,617/-<br>थर्मल पेपर रोल - रु.36,000/- |
| 9 | Diesel Variation रक्कम (कराराप्रमाणे देय) | रू.8,88,738/- | मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे समवेत दि.31/07/2019 रोजीचे करारातील अट क्र.16.3.6 नुसार डिझेल दर वाढीतील फरकाची रक्कम प्रती सहामाही अदा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सदरची रक्कम देय आहे.<br><br>दि.01/08/2019 ते दि.17/12/2020 - रु.8,88,738/- |
| 10 | सुरक्षा अनामत रक्कम मधील तडजोड रक्कम | रू.95,92,000/- | मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी उक्त देय प्रलंबित रक्कमासह एकूण रक्कम रु.19,43,99,990/- इतकी रक्कम मागणी केली आहे. मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयाकडील प्रकरणाच्या अनुषंगाने मोठया प्रमाणात रक्कमा मागणी केलेल्या आहेत. सदरचे प्रकरण पुढे सुरू ठेवल्यास महानगरपालिकेस आर्थीक नुकसान होऊ शकते. त्यामुळे मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी वेळोवेळी झालेल्या चर्चेमध्ये त्यांचे प्रत्यक्ष झालेले नुकसान म्हणून सुरक्षा अनामत रक्कम रु.1.00 कोटी परतावा मागणी केली आहे. यासंदर्भात वादाचे समेट / तडजोड करून निराकरण करण्याच्या दृष्टीने व याचिका मागे घेण्याच्या दृष्टीने निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदर रक्कमेतून मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी प्रथमत: महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे दि.25/09/2020 ते 15/10/2020 या कालावधीत बससेवा न चालविल्या बद्दल दंड म्हणून रु.4,08,000/- वसुल करून उर्वरीत रक्कम रु.95,92,000/- तडजोड रक्कम म्हणून मान्य करण्यात आली आहे. |
| TOTAL | | 3,13,59,365/- | |

| मे. भागिरथी यांचेकडून वसुल करावयाची रक्कम | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | रक्कम रु. | शेरा |
| 1 | टायर खरेदी खर्च (मोठे) | 18,06,990/- | मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांचेकडून बस ताब्यात घेताना बसमध्ये उपलब्ध नसलेले टायर मनपाने Gem Portal वरून निविदेद्वारे खरेदी करून बस मार्गस्थ करून नविन ऑपरेटर यांना हस्तांतरीत केल्या असल्याने सदरकामी झालेला खर्च वसुल करणे. |
| 2 | (छोटे) टायर खरेदी खर्च | 1,24,900/- | |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | Battery खरेदी खर्च | 3,10,080/- | मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांचेकडून बस ताब्यात घेताना बसमध्ये उपलब्ध नसलेले बॅटरी मनपाने Gem Portal वरुन निविदेद्वारे खरेदी करून बस मार्गस्थ करून नविन ऑपरेटर यांना हस्तातरीत केल्या असल्याने सदरकामी झालेला खर्च वसुल करणे. |
| 4 | Bus No.MH04 EP640 दुरुस्ती खर्च | 18,62,200/- | मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांचेकडून बस ताब्यात घेताना MH04EP640 ही बस संपुर्णत: ब्रेकडाऊन (नादुरूस्त) असल्याने सदर बस Online निविदा मागवून दुरुस्त करून घेतली असुन, सदरकामी झालेला खर्च वसुल करणे. |
| 5 | जादा प्रदान रक्कम वसुली Senior Citizen/Student Concession पास - 89,200/- तिकिट - 60,368/- | 1,49,568/- | जेष्ठ नागरीक / विद्यार्थी यांच्या सवलतीच्या तिकीटाची रक्कम प्रदान करताना नजर चूकीने जास्त प्रदान झालेली रक्कम वसुल करणे. |
| 6 | बालपोषण अधिभार वसुली(नोव्हेंबर व डिसेंबर 2020) | 1,45,932/- | मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांनी नोव्हेंबर 2020 व डिसेंबर 2020 या कालावधीकरीता शासन भरणा न केलेली रक्कम वसुल करुन शासनास भरणा करणे. |
| 7 | प्रवासी कर वसुली (नोव्हेंबर व डिसेंबर 2020) | 4,58,778/- | मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांनी नोव्हेंबर 2020 व डिसेंबर 2020 या कालावधीकरीता शासन भरणा न केलेली रक्कम वसुल करुन शासनास भरणा करणे. |
| 8 | पाणी देयक वसुली (घोडबंदर डेपो) | 75,056/- | घोडबंदर बसडेपो सोयी- सुवीधा वापराबाबत जानेवारी 2020 ते जुन 2020 व नोव्हेंबर 2020 ते 17/12/2020 या कालावधीचे पाणी देयक वसुल करणे. |
| 9 | विदयुत देयक वसुली (घोडबंदर डेपो) | 8,03,592/- | घोडबंदर बसडेपो सोयी- सुवीधा वापराबाबत जानेवारी 2020 ते जुन 2020 व नोव्हेंबर 2020 ते 17/12/2020 या कालावधीचे विदयुत देयक वसुल करणे. |
| 10 | किरकोळ दंड वसुली | 11,700/- | कराराच्या अटींचे उल्लघन केल्याने किरकोळ दंड वसुल करणे. |
| 11 | HDFC बॅक देणे वसुली | 40,00,000/- | मा. DRTII न्यायाधिकरण O.A.No.3290 of 2019 मधील दि.26/11/2019 व दि.05/03/2020 चे आदेशाच्या अनुषंगाने HDFC बँकेस थेट रक्कम देण्याबाबत मनपाने मान्य केलेले असुन मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांचे देयकातुन माहे. जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर 2020 करीता प्रत्येक 10,00,000/- प्रमाणे एकुण रक्कम रु.40,00,000/- HDFC बॅक यांना अदा करणे. |
| 12 | दंड (इन्शुरन्स,फिटनेस न केल्याबद्दल) | 12,10,000/- | कराराच्या अटीशर्तीप्रमाणे दंड आकरण्याची तरतूद आहे. त्यानुसार दंडाची परिगणना करण्यात आली होती. त्यानुसार दंडाची रक्कम रु.31,93,000/- इतकी होत होती. सदरची संपूर्ण दंडाची रक्कम माफ करण्याची मागणी मे. भागिरथी एम.बी.एम.टी प्रा.लि. यांनी करण्यात आली आहे. मात्र, महानगरपालिकेने मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे समवेत दि.31/07/2019 रोजी करारनामा केला होता. करारनामा केल्यानंतर बस्सेवा सुरू करण्यासाठी कालावधी देणे आवश्यक होते. मात्र, त्यावेळी सुरू असलेली बससेवा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नियमित सुरू ठेवणे आवश्यक असल्याने दि.01/08/2019 पासून बससेवा सुरू करण्यासाठी महानगरपालिकेने कार्यादेश दिला होता. तसेच महानगरपालिकेने मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांना बस हस्तांतरण करताना बसचे फिटनेस वैध नव्हते. महानगरपालिकेमार्फत बस फिटनेससाठी आर.टी.ओ. कडे पाठपुरावा केला जात होता. परंतु, जुलै / ऑगस्ट मधील जास्तीचा पाऊस, आर.टी.ओ. चा ट्रॅक कल्याणमध्ये असणे यामुळे बसेस फिटनेस होऊ शकत नव्हत्या. सदर बसेस मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचेमार्फत टप्प्या टप्प्याने फिटनेस केल्या आहेत. त्यामुळे मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे मागणीप्रमाणे पूर्ण दंड माफ न करता ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर पर्यंतचा फिटनेसचा दंड रक्कम रू.19,83,000/- माफ करणे योग्य राहील व ऑक्टोबर नंतरचा फिटनेस व इन्शुरन्स दंड रक्कम रु.12,10,000/- वसूल करणे योग्य असल्याने त्याकरीता मा. आयुक्त यांनी दि.06/02/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वसुल पात्र रक्कम रु.12,10,000/- आहे. |
| एकूण | | 1,09,58,796/- | |

वरील नमुदप्रमाणे मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांना देय असलेल्या एकूण रक्कम रु.3,13,59,365/- मधून महानगरपालिकेला वसुल करावयाची एकुण रक्कम रु.1,09,58,796/- वजा करून निव्वळ रक्कम रु.2,04,00,569/- देय होत आहे. सदरच्या देय वसुल करावयाच्या रक्कमेबाबत मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि.यांचेशी दि.01/02/2024 रोजी चर्चा केली असता, सदरची रक्कम मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी मान्य केलेली आहे.मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि.यांनी तडजोडीसाठी पत्र देखील दिले आहे.तसेच रिट यांचिका क्र.7328/2021 मागे घेण्याचे मान्य केले आहे.सबब, खालील अटीशर्तीच्या अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (1) (h) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचे समवेत तडजोड करणे योग्य होईल.

<u>न्यायालयीन प्रकरणी तडजोडीसाठी अटीशर्ती</u> :-

1. मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांच्या (वर नमुद केल्याप्रमाणे) रक्कमा मान्य करण्यात आल्या असल्याने मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी सदर प्रकरणाची रिट याचिका क्र.7328 of 2021 मागे घेण्यात यावी.
2. मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचे कालावधीतील कामगारांची सर्व प्रकारची देणी देण्याची सर्वस्वी जबाबदारी मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांची राहील.
3. मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेकडून यानंतर कोणतीही रक्कम मागणी केली जाणार नाही. अथवा त्यासाठी कोणतीही दावा न्यायालयात दाखल करण्यात येणार नाही.
4. मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेशी संबंधित सर्व प्रकारची शासकीय देणी देण्याची जबाबदारी मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांची राहील.

तरी, वरील अटीशर्तीच्या आधीन राहून मे.भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेशी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (1) (h) प्रमाणे तडजोड करणेस व त्यांना देय असलेली रक्कम अदा करणेस मंजूरीस शिफारस आहे.

15/02/24.

(अनिकेत मानोरकर)
अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

C:\Users\Admin\Downloads\Goshwara -.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
## प्रशासकीय ठराव दि.१६/ २ /२०२४

प्रकरण क्र. ३८४:- मा. उच्च न्यायालयाकडील W.P.No.7328/2021 मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. विरुध्द मिरा भाईंदर महानगरपालिका व इतर मधील दि.30/11/2021 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (1) (h) नुसार तडजोड करणेबाबत.

ठराव क्र. (३८४)

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस चालविणेसाठी Net Cost Contract (NCC) with Viability Gap Funding (VGF) तत्वावर बस ऑपरेटर म्हणून मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची दि.31/07/2019 रोजीच्या करारानुसार दि.01/08/2019 पासुन नियुक्ती करण्यात आली होती. तसेच कोवीड -19 कालावधीसाठी त्यांचे समवेत दि.25/09/2020 रोजी पुरवणी करारनामा करण्यात आला होता.

परंतू मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचेमार्फत कोवीड-19 चे निर्बंध शिथिल झाल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेने सुचना देऊनही सर्वसाधारण प्रवाशांसाठी बससेवा न चालविल्याने त्यांचे समवेत केलेले सदरचे करार मा. आयुक्त यांचे दि.05/10/2020 रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आले होते. सदर मा. आयुक्तयांचे दि.05/10/2020 रोजीच्या आदेशा विरुध्द मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.94075/2020 दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.15/10/2020 रोजी आदेश पारित करून मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांना त्यांचे कर्मचारी यांचे संरक्षणासाठी व डेपोमधून बस मार्गस्त करणेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त देणेबाबत मा. पोलीस आयुक्त यांना आदेशित केले होते.

मा. उच्च न्यायालयाकडील दि.15/10/2020 रोजीच्या आदेशानुसार मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि.16/10/2020 पासुन बससेवा सुरू केली होती. सदर याचिकेमध्ये पुढील सुनावणी दि.05/11/2020 व दि.26/11/2020 रोजी झाली. दि.26/11/2020 रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सदर रिट याचिका मा. उच्च न्यायालयाने निकाली काढून दि.15/10/2020 रोजीचे आदेश तीन आठवडे म्हणजे दि.17/12/2020 पर्यंत लागू राहतील असे आदेश पारित केले होते. तसेच दि.26/11/2020 रोजीच्या आदेशामध्ये याचिकेतर्फे यांना नविन याचिका दाखल करण्याची Liberty देण्यात आली होती.

मा. उच्च न्यालयाने रिट याचिका क्र.94075/2020 दि.26/11/2020 रोजी निकाली काढून दि.15/10/2020 राजीचे आदेश दि.17/12/2020 पर्यंत लागू राहतील असे आदेशीत केले होते. त्यामुळे मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि.16/10/2020 ते दि.17/12/2020 पर्यंत बससेवा चालविली होती व सदर याचिका निकाली काढल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.18/12/2020 पासुन मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचेकडून बसेस व साधनसामुग्री ताब्यात घेऊन मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वतः बससेवा सुरू केली होती.

दरम्यानच्या कालावधीमध्ये मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची नविन रिट याचिका (ST) No.98298/2020 (W.P No.7328/2021) दाखल केली होती. मात्र सदर याचिकेमध्ये दि.18/12/2020 रोजी मा. उच्च न्यायालयाने "तात्पुरता स्वरुपात कर्मचारी घेऊन बससेवा चालविण्याचे" मिरा भाईंदर महानगरपालिकेचे म्हणणे मान्य करून आदेश पारित केले होते. त्यानुसार पर्यायी व्यवस्था होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.18/12/2020 ते दि.02/02/2021 या कालावधीत स्वतः बससेवा चालविली आहे. तसेच दि.03/02/2021 पासुन नविन ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांची नियुक्त करण्यात आली होती. तसेच मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांचे समवेत केलेले करार महानगरपालिकेने रद्द केल्याने करारातील अट क्र.22-3.1 (व) नुसार त्यांनी बँक गॅरंटी स्वरुपात भरणा केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.1.00 कोटी जप्त करण्यात आली आहे.

मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र.7328 of 2021 बाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दि.30/11/2021 रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीमध्ये मा. न्यायालयाने आदेश पारित केले असून दोन्ही पक्षकार यांनी एकत्रीत बसुन वादाचे निराकरणे करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेसमवेत बैठका घेऊन चर्चा करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी दि.13/12/2021 रोजी त्यांच्या मागणी रक्कमेचे निवेदन सादर करून एकूण रक्कम रु.19,43,99,990/- इतकी रक्कम मागणी केली आहे. मात्र मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी मागणी केलेल्या रक्कमेबाबत महानगरपालिका दप्तरी तपासणी करून त्यांचे समवेत तत्कालीन अति. आयुक्त / आयुक्त यांचेकडे बैठका घेऊन चर्चा करण्यात आली आहे.

मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांनी मागणी केलेल्या रक्कमा मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेशी वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सदर प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (1) (h) प्रमाणे तडजोड प्रस्ताव विचारात घेण्याचे विधी विभागाने अभिप्राय दिले आहेत. तसेच सदरचे न्यायालयीन प्रकरण पुढे चालू राहिल्यास महानगरपालिकेस जास्तीचा भुर्दंड बसू शकतो. त्यामुळे सदर प्रकरणी मे. भागिरथी एमबीएमटी प्रा.लि यांचेशी झालेल्या चर्चेनुसार व उपलब्ध कागदपत्रावरून खालीलप्रमाणे देय व वसुल करावयाच्या रक्कमा दोन्ही पक्षकारांच्या संमतीने निश्चित करण्यात आल्या आहेत.

| मे. भागिरथी यांची मागणी/ देय होणारी रक्कम | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशिल | मागणी रक्कम रु. | शेरा |
| 1 | Viability Gap Funding (VGF) रक्कम कराराप्रमाणे देय | रु.90,39,756/- | परीवहन उपक्रमाच्या बसेस प्रवर्तनासाठी Viability Gap Funding (VGF) करीता रक्कम देय आहे.<br>दि.14/08/2020 ते दि.31/08/2020 - रु.1,33,674/-<br>दि.01/09/2020 ते दि.07/09/2020 - रु.54,404/-<br>दि.16/10/2020 ते दि.31/10/2020 - रु.5,47,351/-<br>दि.01/11/2020 ते दि.30/11/2020 - रु.24,11,069/-<br>दि.01/12/2020 ते दि.17/12/2020 - रु.58,93,258/- |
